पी. एस. म्हापसेकर, गोवा.

□ जॉय मुखर्जीचा *लव्ह इन बॉम्बे* हा चित्रपट मुंबईत लागला होता का? जॉय मुखर्जीचा शेवटचा चित्रपट कोणता?

— *लव्ह इन बॉम्बे* मुंबईत प्रदर्शित झाला नाही. *कहानी फुलवती* की हा जॉय मुखर्जीचा शेवटचा चित्रपट.

सुषमा कातकर, बोरीवली.

□ शशी कपूर व मिथुन यांनी कोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

— *कमांडो*.

आर. आर. साखरे, जामखेड.

□ हिंदीत संगीतकार म्हणून किती महिलांनी नाव कमावलं? त्यांनी संगीत दिलेले चित्रपट कोणकोणते?

— हिंदीत संगीतकार म्हणून सरस्वतीदेवी व उषा खन्ना या दोनच महिलांनी नाव कमावलं. *अछुत कन्या, जन्मभूमी, जीवन नय्या, ममता व मिया बीबी, इज्जत, प्रेम कहानी, सावित्री, भाभी, निर्मला, वचन, दुर्गा, कंगन, नवजीवन, आझाद, बंधन, झुला, नया संसार, भक्त रायदास, पृथ्वीवल्लभ, डॉ. कुमार, परख, आम्रपाली, जवानी की हवा* हे सरस्वतीदेवीने संगीत दिलेले चित्रपट आणि *दिल दे के देखो, हम हिंदुस्तानी, फ्लॅट नं. ९, आवारा बादल, दारा, आवो प्यार करे, शबनम, एक सपेरा एक लुटेरा, मैं हूं अल्लाद्दिन, निशान, आग, अलिबाबा और चालीस चोर, बादल, इन्साफ, खून का खून, लाल बंगला, मैं वही हूं, एक रात, दिलरुबा, जोहर इन बॉम्बे, मेरा नाम जोकर, रात अंधेरी थी, वो कोई और होगा, ट्रीप टू मून, एक फूल एक भूल, फरेब, हाय मेरा दिल, अंजान है कोई, बंदीश, हम एक है, समय बडा बलवान, सिमला रोड, बेगुनाह, दीदार, इल्जाम, इन्सान और शैतान, कौन हो तुम?, नाईट इन कलकत्ता, सस्ता खून महेंगा पानी, सौ साल बीत गये, बहरूपियाँ, खोज, नागपूजा, द क्रिमिनल्स अर्थात हम सब चोर है, सामना, मुनीमजी, तन्हाई, हनीमून, सबक, हवस, लडकी भोली भाली, मजदूर झिंदाबाद, अब क्या होगा, अलिबाबा मर्जिना, गुमराह, साजन बीन सुहागन, सोने का दिल लोहे के हाथ, बीन फेरे हम तेरे, भयानक, दादा, मेरे बीवी की शादी, नागीन और सुहागन, आप तो ऐसे न थे, बहके कदम, बम्बई का महाराजा, बेशक, हॉटेल, कारण, लडाकू, साजन की सहेली, शमा, तर्जुबा, आदत से मजबूर, अनोखा बंधन, गोपीचंद, जासूस, लक्ष्मी, प्यारा दोस्त, पत्थर की लकीर, सती और भगवान, अच्छा बुरा, बेखबर, जय बाबा अमरनाथ, पाचवी मंजिल, रास्ते और रिश्ते, स्वीकार किया मैने, सौतन कॅटरन बेरी, डायव्हर्स, कुंवारी बहू, लैला, रक्तबंधन, प्यासी आँखे, सरदार महक, पैसा यह पैसा, औरत, दूर देश, जवानी की कहानी, प्रीती, सस्ती दुल्हन महेंगा दुल्हा, गुलामी की जंजीर, कच्ची कली, कौन जीता कौन हारा, कानून कानून है, मानमर्यादा, प्यार की जीत, विशाल, यातना, खरिददार, आग लगा दो सावन को, अमावस की रात, औरत और पत्थर, बेवफा से वफा, बिजली, चुडैल, दीवानगी, दिल अपना और प्रीत पराई, घरबाजार, घायल शेरनी, हालात, इंतकाम के शोले, जाम लढा देंगे, कमसीन हसीना, खेल मोहब्बत का, खूनी रात, खुली खिडकी, लाश, लहू की आवाज, लोहे के हाथ, मेहंदी बन गयी खून, मेरे बाद, नागिन और सुहागन, नया खून, पापी फरिश्ते, राजूदादा, रामवती, सात बिजलीया, सनम हरजाई, जिम्मेदार* हे उषा खन्नाने संगीतबद्ध केलेले चित्रपट.

विश्वजीत सात्ते, खडकी.

□ पहिल्याच चित्रपटात खलनायक म्हणून हिट झालेले अभिनेते कोणते?



'ये हाथ मुझे दे दे ठाकूर'
शोलेत संजीवकुमारसह अमजद खान

— चंद्रमोहन(*अमृतमंथन*), अमरीश पुरी(*निशांत*), अमजद खान(*शोले*), रणजीत(*सावन भादो*), सदाशिव अमरापूरकर(*अर्धसत्य*), प्रेम चोप्रा(*वह कौन थी?*)

भरत कालूवाला, माहीम कॉजवे.

□ सोनिक-ओमी या जोडीने संगीत दिलेले चित्रपट?

— *दिल ने फिर याद किया, आबरू, बेदी, महुआ, मि. मर्डर, सोल्जर, मुजरिम, सावन भादो, ट्रक ड्रायव्हर, दोस्त और दुश्मन, लडकी पसंत है, भाई हो तो ऐसा, दो यार, एक खिलाडी बावन पत्ते, सजा, आंगन, बिंदिया और बंदूक, धर्मा, तीन चोर, वही रात वही आवाज, यौवन, दो चट्टाने, खून की किमत, वो मैं नही, अंधेरा, जग्गू, रफ्तार, रंगा खूश, उम्रकैद, फौजी, प्ले बॉय, शंकरदादा, दो शोले, यारी झिंदाबाद, दो चेहरे, लडकी जवान हो गई, पंडित और पठाण, दुर्गा, जमानत, अपना खून, चौकी नं. ११, राम कसम, लाखन, राखी की सौगंध, जुल्म की पुकार, बदला और बलिदान, लहू पुकारेगा, तीन एक्के, ज्वाला डाकू, खून की टक्कर, मान गये उस्ताद, हीरो का चोर, कसम दुर्गा की, फर्ज की किमत, रामकली, जुल्म का बदला, आदमखोर, चंबल का बादशहा, राम मिलाये जोडी, फकिर बादशहा, गोरा, हमारी जंग, जागो हुआ सवेरा, सीतापूर की गीता*.

अनिल पाटील, जळगाव.

□ आपलं खरं नाव बदलून टोपण नावाने किती कलाकार इंडस्ट्रीत नावारूपाला आले? त्यांची खरी नावं काय?

— आपलं खरं नाव बदलून टोपण नावाने वावरणारे अनेक कलाकार इंडस्ट्रीत नावारूपाला आलेत. त्या सर्वांची नावं येथे देता येणं शक्य नाही. पण काही ठळक नावं देत आहोत. अशोककुमार (कुमुदलाल गांगुली), दिलीपकुमार(युसुफ खान), नरगीस(फातिमा रशीद), जितेंद्र(रवी कपूर), जॅकी श्रॉफ(जयकिशन), अजित(हमीद), सुनील दत्त(बलराज दत्त), किशोरकुमार (आभासकुमार), मनोजकुमार(हरीकृष्ण गोस्वामी), राजेश खन्ना(जतीन खन्ना), संजीवकुमार(हरी जरीवाला), मीनाकुमारी (महजबीन), सीमा देव(नलिनी), मधुबाला (मुमताज), कामिनी कौशल(उमा सूद), निम्मी(नवाबजान) आदी.